RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ५३

दि. १६ जून २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## लातूरकरांशी थेट संवाद साधणार पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप

**लातूर/प्रतिनिधी :** नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे मंगळवार, दि. १६ जून रोजी लातूर दौऱ्यावर येत आहेत.



लातूर जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेण्यासाठी ते जिल्ह्यात दाखल होणार असून, यावेळी नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा उपक्रमही राबविण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयात दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत शहाजी उमाप नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहणार आहेत. या कालावधीत नागरिकांना कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, वाहतूक, पोलिस प्रशासनाशी संबंधित अडचणी तसेच अन्य तक्रारी व समस्या थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. पोलीस प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपल्या समस्या आणि सूचना पोलीस उपमहानिरीक्षकांसमोर मांडाव्यात, असे आवाहन नांदेड परिक्षेत्र पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाकडून करण्यात आले आहे. नागरिकांनी ठरलेल्या वेळेत पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. हा संवाद कार्यक्रम नागरिकांच्या तक्रारींना थेट न्याय मिळवून देण्यासाठी आणि पोलिसांवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## संत महात्मे यांच्या उपस्थितीत दगडूभाऊ दळवे यांचा वाढदिवस साजरा



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील कर्मवीर शिक्षण संस्थेचे संचालक, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, यांचा वाढदिवस नुकताच संपन्न झाला आहे. शैक्षणिक ,राजकीय, सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर, सर्वांच्या सुख दुःखात नेहमी सहभागी असलेले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून दगडूभाउ दळले यांची ओळख आहे. वाढदिवसाचे व अधिक मासाचे औचित्य साधून केज परिसरातील अनेक संत महंत व महाराज यांच्यासह सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी ह.भ.प.केशव महाराज शास्त्री, श्रीकृष्णाश्रम केज, वै. श्रीधर नाना यांचे सुपुत्र ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पिंपरीकर व त्यांचा परीवार, ह. भ.प.विष्णू महाराज शास्त्री,ह. भ.प.सुनिल महाराज गालफाडे, ह.भ.प.सौ. शारदाताई गालफाडे श्रीविठ्ठल जनाई वारकरी शिक्षण संस्था चिंचोली माळी, श्रीक्षेत्र उत्तरेश्वर मंदिर पुजारी ह.भ.प. भाऊसाहेब मोकाशी सपत्नीक, ह.भ.प.संभाजी महाराज कदम,ह.भ.प.संजय महाराज नखाते, ह.भ.प.अबा महाराज मेहरकर, ह.भ.प.रवी महाराज गायकवाड, ह.भ.प.पंढरीनाथ काळे, तसेच दिलीप गायवकड सर, राजाभाऊ भुजबळ, राजाभाऊ नखाते, मोहनराव बर्डे इत्यादी मित्र मंडळी देखील उपस्थित होती. वाढदिवसानिमित्त राजकीय सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## नौदल माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी १९ जून रोजी लातूर येथे विशेष बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी मुंबई येथील नौदल अधिकारी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत १९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला मुंबईहून येणारे नौदल अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, ते माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या समस्या, तसेच प्रलंबित प्रश्न जाणून घेणार आहेत. तरी आपल्या अडीअडचणी व समस्या मांडण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि अवलंबितांनी १९ जून रोजी सकाळी १० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेतानाच मैदानी खेळांनाही प्राधान्य द्यावे - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

### शाळा प्रवेशोत्सवांतर्गत विद्यार्थ्यांचे स्वागत

**मुंबई/प्रतिनिधी :** शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून व्यक्तिमत्त्व विकास, संस्कार संवर्धन आणि जीवनाला दिशा देणारे केंद्र आहे. आज विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले शिक्षण, मूल्ये आणि संस्कारच उद्याचे जागरूक नागरिक, संवेदनशील व्यक्तिमत्त्व आणि राष्ट्रनिर्माते घडवणार आहेत. शिक्षणाबरोबरच स्वस्थ शरीर आणि स्वस्थ मन जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असून विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेतानाच मैदानी खेळ, योग आणि संगीतालाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.



राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील मुंबई पब्लिक स्कूलमध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' आयोजित करण्यात आला. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, शिक्षण समिती अध्यक्ष राजेश्री शिरवडकर, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) डॉ.अविनाश ढाकणे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी नवीन शैक्षणिक वर्षास प्रारंभ करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना प्रथमच शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत येऊन जिज्ञासू वृत्ती जोपासावी, प्रश्न विचारावेत आणि शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित संस्कार व कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संकल्पित केलेल्या 'विकसित भारत २०४७'च्या स्वप्नपूर्तीत आजच्या विद्यार्थी पिढीची सर्वाधिक महत्त्वाची भूमिका राहणार आहे, असे प्रतिपादन राज्यपाल यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांमध्ये संगीत आणि योग शिक्षणाला अधिक प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असल्याचे राज्यपालांनी सांगितले. संगीतामुळे संवेदनशीलता आणि सर्जनशीलता विकसित होते, तर योगामुळे शरीर आणि मन निरोगी राहते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक मित्र जोडावेत, एकमेकांकडून शिकावे, एकत्र खेळावे. मोबाईल फोनवर वेळ घालविण्याऐवजी मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपालांनी केले. खेळामुळे आरोग्य, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होते. निरोगी शरीर आणि निरोगी मन ही यशाची भक्कम पायाभरणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यपालांनी विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व, संस्कार आणि शिक्षण मजबूत करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे नमूद केले. आजच्या युगात कौशल्य विकास, क्रीडा, बहुभाषिक शिक्षण आणि डिजिटल साक्षरता महत्त्वाची असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी सक्षम आणि आत्मनिर्भर बनविणारे शिक्षण देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्यासाठी कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका, शाळा प्रशासन, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे राज्यपालांनी कौतुक केले. तसेच पालकांनीही मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेऊन त्यांना स्वप्नपूर्तीसाठी सातत्याने प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले.

महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये उत्कृष्ट सोयी सुविधा देण्यात येत असून भविष्यातील उत्कृष्ट नागरिक घडविण्यासाठी शिकण्याची प्रक्रिया आनंददायी करण्यावर भर असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या काळात महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी मागे राहणार नाहीत याची दक्षता घेतली जात असल्याचे सांगून राज्य मंडळाबरोबरच सीबीएसई, आयसीएसई अभ्यासक्रमांचे शिक्षण देखील दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. शिक्षणाबरोबरच संगीत, खेळ यांनाही महत्व देण्यात येत असून दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून उत्कृष्ट नागरिक घडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपालांचे आभार मानताना अतिरिक्त आयुक्त डॉ.अविनाश ढाकणे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकांच्या शाळांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली. यावेळी राज्यपालांनी शाळेतील प्रवेश प्रक्रियेचे अवलोकन करून खगोलशास्त्र प्रयोगशाळा, पूर्व-प्राथमिक वर्ग, स्मार्ट क्लासरूम, संगणक प्रयोगशाळा आणि एफएलएन प्रयोगशाळेची पाहणी केली. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच मध्यान्ह भोजनाचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात

## उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर आडवोकेट प्रकाश आंबेडकरांनी भूमिका स्पष्ट करावी; आनंदराज आंबेडकरांचा स्पष्ट विरोध

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील आंबेडकरी चळवळीत चर्चा सुरू असताना, रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी उपवर्गीकरणाला स्पष्ट विरोध दर्शविला आहे. त्यांनी या विषयावर आपली भूमिका जाहीर करताना अनुसूचित जाती समाजात फूट पाडणारे कोणतेही धोरण स्वीकारले जाणार नसल्याचे म्हटले आहे.



दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. उपवर्गीकरणासंदर्भात देशभरात राजकीय आणि सामाजिक चर्चा सुरू असताना, आंबेडकरी समाजाचे महत्त्वाचे नेते म्हणून प्रकाश आंबेडकर यांची भूमिका जाणून घेण्याबाबत उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनुसूचित जातींना मिळणाऱ्या घटनात्मक आरक्षणामध्ये उपवर्गीकरण केल्यास समाजातील एकात्मता बाधित होऊ शकते. त्यामुळे या प्रस्तावाला त्यांनी विरोध दर्शविला आहे. तसेच या संवेदनशील विषयावर सर्व संबंधित संघटना आणि नेत्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर पुढील काळात आंबेडकरी संघटना आणि राजकीय पक्षांमध्ये अधिक चर्चा होण्याची शक्यता असून, आडवोकेट प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेकडे समाजाचे लक्ष लागले आहे.

## व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**चाकुर/प्रतिनिधी :** व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे जिल्हा अध्यक्ष शरद भाऊ किणीकर यांच्या वाढदिवसा निमित्त तालुका शाखा चाकूर च्या वतीने ग्रामीण रुग्णालय चाकूर येथे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले या वेळी डॉ नरवटे साहेब तसेंच पँथर्स ग्रुप तालुका अध्यक्ष समाधान गायकवाड, शहर अध्यक्ष विक्रम कांबळे, सचिव गजानन कांबळे, पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे तालुका अध्यक्ष मिलिंद कांबळे, व्ही .एस. पँथर जिल्हाउपाध्यक्ष कुलदीप कांबळे, शैलेश महालिंगे, संगम डोंगरे, महादेव गायकवाड,विकास भालेराव,स्वप्नील गायकवाड, ओम शिंदे, बंटी जाधव, सचिन जाधव,सिद्धार्थ किणीकर,अतुल गायकवाड, रंजित कांबळे, समाधान कांबळे इंद्रजीत कांबळे व आदिजण

# भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांचा मतदारांशी संवाद

## लातूर ग्रामीण मधून बसवराज पाटील यांना मोठे मताधिक्य देऊ - आ.रमेशआप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी :** उस्मानाबाद लातूर बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांना लातूर ग्रामीण मतदार संघातून अपेक्षेपेक्षा अधिक मताधिक्य देऊ अशी ग्वाही भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.



भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील प्रयाग या निवासस्थानी रविवारी सकाळी सदिच्छा भेट देऊन लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदारांशी संवाद साधला यावेळी औसा मतदार संघाचे आ. अभिमन्यू पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील आणि आ. अभिमन्यू पवार यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

उस्मानाबाद लातूर बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीकरिता असलेल्या मतदारातून भाजपा आणि मित्रपक्षाशिवाय इतरही मतदारांना सोबत घेऊन भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून मोठे मताधिक्य मिळवून देऊ अशी ग्वाही यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली तर आ. अभिमन्यू पवार यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी बसवराज पाटील यांचा विजय महत्त्वाचा असल्याचे बोलून दाखविले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि भाजपा पक्ष नेतृत्वाने माझ्यावर टाकलेला विश्वास निश्चितपणे सार्थ ठरवू मतदारांनी मतदानरुपी आशीर्वाद देऊन काम करण्याची संधी द्यावी असे याप्रसंगी बसवराज पाटील यांनी बोलून दाखविले. यावेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक मतदारांशी संवाद साधला.

या बैठकीस भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. छायाबाई चिंचोलकर, रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका सुर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, उपनगराध्यक्ष खैरुनिसा आत्तार, नगरसेवक दत्ता सरवदे, सौ. ज्योती चव्हाण, सौ. सुनीता बसतापुरे, सौ. धरती गाडे, सौ. राबिया शेख, प्रदीप राठोड, वाहेद शेख, सौ. हुसेना शेख, रमाकांत वाघमारे, भाजपाचे पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, रवी सुर्यवंशी, ॲड. दशरथ सरवदे, विजय चव्हाण, अजिम शेख, महेश गाडे यांच्यासह मतदार भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय...

### उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर रामदास आठवले यांची भूमिका : समाजाचा आवाज की सत्तेची बाजू?

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना दिलेले आरक्षण हे सामाजिक न्यायाचे साधन आहे. मात्र आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आल्यापासून दलित समाजात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या प्रश्नावर केंद्रीय मंत्री आणि रामदास आठवले यांनी घेतलेली भूमिका अनेकांच्या नाराजीचे कारण ठरत आहे. उपवर्गीकरणाच्या मुद्द्याला आठवले यांनी दिलेला पाठिंबा हा दलित समाजाच्या एका मोठ्या वर्गाला मान्य नाही. कारण अनेकांना वाटते की या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये आणखी विभागणी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. रामदास आठवले हे रिपब्लिकन चळवळीच्या परंपरेतून पुढे आलेले नेते आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या नेतृत्वाकडून समाजाला अधिक ठाम भूमिका अपेक्षित असते. त्यामुळे त्यांची प्रत्येक राजकीय भूमिका समाजाकडून बारकाईने पाहिली जाते. उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेला पाठिंबा दिल्यानंतर अनेक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांच्या मते, हा पाठिंबा सामाजिक न्यायापेक्षा राजकीय सोयीचा अधिक वाटतो. आज दलित समाज विविध प्रश्नांशी झुंज देत आहे. शिक्षण, रोजगार, अत्याचार आणि सामाजिक विषमता यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर ठोस नेतृत्वाची गरज आहे. अशा वेळी समाजाला एकत्र आणण्याऐवजी विभागणी करणाऱ्या निर्णयांना समर्थन देणे योग्य आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. राजकारणात युती आणि आघाड्या असतात. सत्तेत राहण्यासाठी तडजोडीही कराव्या लागतात. परंतु समाजहित आणि सत्ताहित यांच्यात संघर्ष निर्माण झाला तर प्राधान्य कोणाला द्यायचे हा खरा कस असतो. आठवले यांच्यावर अनेकदा असा आरोप केला जातो की त्यांनी सत्ताधारी पक्षाशी अतिशय जवळीक साधली आहे. त्यामुळे त्यांच्या स्वतंत्र राजकीय भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दलित समाजातील अनेक तरुणांना वाटते की रिपब्लिकन चळवळीचे नेतृत्व आता संघर्षाऐवजी सत्तेभोवती फिरताना दिसते. त्यामुळे समाजाच्या अपेक्षा आणि नेतृत्वाच्या कृती यांच्यात दरी वाढत चालली आहे. उपवर्गीकरणाचा प्रश्न केवळ कायदेशीर नाही तर सामाजिक आणि राजकीयदेखील आहे. त्यामुळे या विषयावर व्यापक चर्चा आणि समाजातील सर्व घटकांचा सहभाग आवश्यक आहे. रामदास आठवले यांची भूमिका पाहता अनेकांना असे वाटते की त्यांनी समाजातील विरोधी मतांना पुरेसे महत्त्व दिले नाही. त्यामुळे त्यांच्या निर्णयावर टीका होणे स्वाभाविक आहे. कोणताही नेता संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतो असा दावा करता येत नाही. समाज विविध विचारांचा असतो. त्यामुळे एखाद्या नेत्याची भूमिका म्हणजे संपूर्ण समाजाची भूमिका असे मानणे चुकीचे ठरेल. आज अनेक दलित संघटना आणि कार्यकर्ते उपवर्गीकरणाच्या विरोधात उभे आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि त्यांना चर्चेत सहभागी करणे आवश्यक आहे. लोकशाहीत मतभेद असणे हे आरोग्यदायी असते. मात्र मतभेदांना देशद्रोह किंवा समाजद्रोह म्हणून पाहणे योग्य नाही. त्याचप्रमाणे पाठिंबा देणाऱ्यांची भूमिका तपासणेही तितकेच आवश्यक आहे. आठवले यांनी जर उपवर्गीकरणाला पाठिंबा दिला असेल, तर त्यामागील सामाजिक आणि राजकीय कारणे स्पष्ट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. समाजाला उत्तर देणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य असते. दलित राजकारणाची ताकद ही त्याच्या एकजुटीत आहे. ही एकजूट कमकुवत करणाऱ्या कोणत्याही निर्णयाबाबत समाजात प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे. राजकीय समीकरणे बदलतात, सत्ताधारी पक्ष बदलतात, परंतु सामाजिक न्यायाची लढाई कायम राहते. त्यामुळे नेतृत्वाने अल्पकालीन राजकीय फायद्यांपेक्षा दीर्घकालीन सामाजिक हिताचा विचार करायला हवा. आज गरज आहे ती खुल्या संवादाची. उपवर्गीकरणाचा मुद्दा भावनिक घोषणांपेक्षा तथ्ये आणि सामाजिक वास्तव यांच्या आधारे चर्चिला गेला पाहिजे. रामदास आठवले यांच्यावर टीका करणाऱ्यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी समाजाच्या व्यापक भावनांपेक्षा सत्तेच्या भूमिकेला प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांच्यावरील विश्वास कमी होत असल्याची भावना व्यक्त केली जाते. शेवटी, कोणताही नेता समाजापेक्षा मोठा नसतो. समाजाचे हित, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्ये यांनाच सर्वोच्च स्थान असले पाहिजे. उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर रामदास आठवले यांच्या भूमिकेची टीका ही याच निकषांवर होत आहे. लोकशाहीत नेत्यांची भूमिका तपासली जाणे आणि त्यांच्याकडे जाब मागितला जाणे हेच लोकशाहीचे खरे सामर्थ्य आहे.

# दृष्टी शिवाय सृष्टीचा मनमुराद आनंद घेणारी दिव्यदृष्टी सहल मोठ्या उत्साहात संपन्न

## महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील ७० दृष्टि दिव्यांगाचा सहभाग





**लातूर/प्रतिनिधी :** बीयाँड व्हीजन फाउंडेशन, लातूर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर (प्रादेशिक उपाध्यक्षा भाजपा, महाराष्ट्र), ॲड. धनंजय चिताडे परिवार, मित्र मंडळ, ॲड. विक्रमजी पाटील चाकूरकर, लातूर शहरातील दानशूर व्यक्ती व संस्था यांच्या सक्रीय मार्गदर्शन आणि आर्थिक सहकार्यातून महाराष्ट्र राज्यातील १५ जिल्ह्यातील अत्यल्प उत्पन्न गटातील ७० दृष्टि दिव्यांग व्यक्तींसाठी ओमकारेश्वर, उज्जैन, सिहोर, चित्रकूट, अयोध्या, काशी, प्रयागराज, माहूर व माळेगाव येथील देव/देवतांच्या दर्शणार्थ ९ दिवसीय लातूर/अयोध्या/लातूर दिव्यदृष्टी सहलीचे आयोजन दि. २७ मे ते ०४ जून २०२६ या कालावधीत करण्यात आले होते.

या सहलीचा उद्घाटन समारंभ दि. २७ मे २०२६ रोजी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, (प्रादेशिक उपाध्यक्षा, भाजपा, महाराष्ट्र), रोटरी डीस्ट्रीक्ट ३१३२चे प्रांतपाल सुधीर लातूरे, लक्ष्मीरमण लाहोटी (अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था, लातूर), लक्ष्मीकांत कर्वा (राजस्थानी शिक्षण संस्था, लातूर), श्रीमती गंगाबाई व्यंकटराव चिताडे, विक्रमजी पाटील चाकूरकर, सुनीलजी ओझा, राजेश मीत्तल, डॉ. शांतीलाल शर्मा यांच्या प्रमुख उपस्थीतीत हॉटेल पार्थ, अंबाजोगाई रोड, लातूर येथे सकाळी बारा वाजता संपन्न झाला.

दि. २७ मे रोजी लातूरहून निघालेल्या या सहलीतील सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांनी २८ मे २०२६ रोजी मामलेश्वर व त्यानंतर नर्मदा नदीचा घाट पार करून श्री. ओमकारेश्वर भगवानाचे, दि. २९ मे २०२६ रोजी उज्जैन येथे पहील्यांदा काल भैरव व त्यानंतर श्री. महाकालेश्वर भगवानाचे, त्याच दिवशी संध्याकाळी सिहोर येथे कुब्रेश्वर धाम येथे श्री कुब्रेश्वर भगवानाचे, दि. ३० मे २०२६ रोजी चीत्रकूट येथे मंदाकीनी नदीचे विविध घाट, राम-भरत भेट, हनुमान धारा आदि मंदीरांना भेट देऊन तेथील देव देवतांचे दर्शन, दि. ३१ मे २०२६ रोजी अयोध्या येथे श्रीराम जन्मभूमी येथील मंदिरात श्री. राम लल्लांचे दर्शन, हनुमान गडी दर्शन, दशरथ महल दर्शन, संध्याकाळी सात वाजता शरयू आरती, दि. १ जून २०२६ रोजी काशी विश्वनाथ भगवानाचे दर्शन, संध्याकाळी सात वाजताची गंगा आरती, दि. ०२ जून २०२६ रोजी पर्याग राज येथे जाऊन त्रिवेणी संगमावर गंगास्नान, दि. ३ जून २०२६ रोजी नागपूर वानाडोंगरी नागलवाडी स्थित श्री. गजानन महाराजाचे, दि. ०४ जून २०२६ रोजी माहूरगड येथे अनुसया माता, रेणुका माता, श्री. दत्तात्रय व शेवटी माळेगाव येथे श्री. खंडोबाचे दर्शन मोठ्या उत्साहाने व भक्ती भावाने घेतले.

या सर्व देवस्थानी दर्शन घेताना दृष्टी दिव्यांग दर्शणार्थ्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद होता. अयोध्या, उज्जैन, काशी, ओंकारेश्वर येथील मंदिर प्रशासनाने दृष्टी दिव्यांग व्यक्तींच्या विशेष गरजा ओळखून त्यांना सुगम्य स्वरूपातील दर्शन घेण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न उल्लेखनीय ठरले.

या प्रवासात विविध मंदिरात आलेले सुखद अनुभव दृष्टी दिव्यांग दर्शनार्थी कधीही विसरू शकणार नाहीत या सुखद अनुभवामध्ये श्रीराम प्रभूंच्या मंदिरात प्रवेश करताना सर्व दिव्यांग दर्शनार्थ्यांमध्ये श्रीराम लल्लांच्या दर्शनाविषयी असलेली प्रचंड उत्सुकता, तेवढीच उत्साही व जिज्ञासू वृत्ती, मंदीर प्रशासनाकडून सर्व दर्शनार्थ्यांस विशेष अतिथी कोट्यातून, सामान्य रांग थांबवून, दिव्यांग दर्शणार्थ्यांची विशेष रांग तयार करून विशेष दर्शन घेण्याची, उपलब्ध करून दिलेली संधी, सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांनी मंदिरात घालवलेले तीन तास, श्रीराम लल्लांचे दर्शन घेऊन अत्यंत प्रसन्न मुद्रेने मंदिरा बाहेर पडणारे हे सर्व दिव्यांग दर्शनार्थी या बाबी अत्यंत संस्मरणीय ठरल्या.

हा अनुभव त्यांच्या जिवनातील संस्मरणीय अनुभव ठरला. या अनूभूती ते कधीही विसरणार नाहीत एवढ्या या अनुभूती अमित होत्या.

दृष्टी शिवाय सृष्टीचा आनंद घेण्याची ही धडपड अयोध्या येथे आजतक व काही स्थानिक दूरदर्शन चॅनलनी त्यांच्या कॅमेऱ्यात टिपली. त्यांनी या सहलीत सहभागी दिव्यांग दर्शणार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे मनोगतही जाणून घेतले. अयोध्या येथील श्रीराम प्रभूंच्या मंदिरासमोरील हे दृश्य खरोखरच खूप अलौकीक होते. दृष्टिशिवाय सृष्टिचा आनंद घेण्याचा हा प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय असल्याचे दिसून आले.

अयोध्या येथील श्रीराम प्रभूंचे दर्शन व शरयू आरतीचा आनंद घेऊन दर्शन आर्थी सद्गदित झाल्याचे दिसून आले. त्यापैकी काहीजण म्हणाले की, आम्ही कीत्येक दिवसांपासून श्रीराम प्रभूंच्या दर्शनासाठी अतुर होतो व तसेच शरयू आरतीबद्दल खूप ऐकले होते. आज आम्ही या शरयू आरती मध्ये सहभागी होऊन आमचे भाग्य उचळले आहे. आम्ही कल्पनाही करू शकत नाही की, आम्ही आज श्रीराम प्रभूंचे दर्शन घेतले आहे तसेच या शरयू आरती मध्ये सहभागी होऊ शकलो आहोत. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक भवन साकेत नीलयम अयोध्या, या राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वपूर्ण व प्रशस्त, पवित्र स्थळी निवासाची मिळालेली संधी ही बाबसुद्धा या प्रवासातील अत्यंत उल्लेखनीय अनुभूती ठरली.आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील काही पदाधिकार्यांशी संवाद साधू शकलो. संघाच्या कार्याविषयी अधिक जाणून घेऊ शकलो. अशी काही दर्शनार्थ्यांनी आपली उत्स्फूर्त भावना व्यक्त केली.

त्याचबरोबर ओमकारेश्वर, उज्जैन येथील कालभैरव व श्री. महाकाल तसेच श्री. काशी विश्वनाथ येथील मंदीर प्रशासनाने या सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांना विशेष दर्शन मिळावे म्हणून केलेली धडपड प्रत्येकाच्या मनात घर करून राहिली. त्यामध्ये श्री काशी विश्वनाथ मंदिरात सर्व दर्शणार्थ्यांस मंदीराच्या गाभार्यासमोर बसवून त्यांना रात्रीच्या काशी विश्वनाथ आर्तीचा आनंद घेण्याची संधी उपलबध् करून दिली. प्रत्येकांस प्रसन्न वाटत होते. प्रत्येकाच्या मनात प्रचंड उत्साह होता. सर्व जण देवाच्या उत्घोषात मग्न होते.

श्री. काल भैरव मंदीर प्रशासनाने सर्व दिव्यांग दर्शनार्थी यांना सामान्य भक्तांची रांग थोपवूनव गाभाऱ्यापर्यंत नेऊन मूर्तीसमोर थांबवून विशेष दर्शन घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आणि मोठ्या आस्थेने प्रसादही दिला.

उज्जैन येथील श्री. महाकालेश्वर मंदीर प्रशासनातील कर्मचारी व सुरक्षा रक्षकांनी मोठ्या उत्साहाने व उत्सूकतेने सर्व दिव्यांग दर्शणार्थ्यांस सुलभपणे गाभाऱ्यापर्यंत पोहोचवून अत्यंत निवांतपणे दर्शन घेण्यासाठी केलेले विशेष सहकार्य ही बाबही अत्यंत उल्लेखनीय ठरली. दर्शनानंतर मंदीर प्रशासनाने सर्व दिव्यांग दर्शनार्थ्यांस गाभाऱ्या शेजारी एकत्रीत बसवून त्यांच्या प्रातीनीधीक स्वरूपात मुलाखती आणि छायाचीत्रीकरण केले आणि महाप्रसाद ग्रहण करण्याची केलेली विनंती विशेष आपलेपणा दर्शविणारी ठरली.

या प्रवासात सर्व दिव्यांग बंधू-भगिनींना ओमकारेश्वर येथे नर्मदा, चित्रकूट येथे मंदाकिनी व काशी येथे गंगा नदीतून बोटीतून प्रवास करण्याची मिळालेली संधी त्यांच्या जीवनात आगळा वेगळा आनंद देणारी ठरली असे प्रसंग त्यांच्या जीवनात दुर्मिळ मानले जातात. बोटिंग करताना प्रत्येकांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता.

या प्रवासादरम्यान दि. २८ मे रोजी पुणे येथील दृष्टी दिव्यांग दांपत्ये दशरथ व जयश्री शिंदे यांच्या लग्नाचा वाढदिवस, बीयाँड व्हीजन फाउंडेशन, लातूरचे सचीव संदिप चोपडे व कोषाध्यक्षा मीरा चोपडे यांच्या लग्नाचा वाढदिवस, तसेच दि. ०२ जून रोजी स्वयंसेवकांपैकी नागनाथ मेकले यांचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ही बाब परस्परांविषयी आपुलकी वाढविणारी व सामाजिक सौहार्द संवर्धित करणारी ठरली.

दि. ०३ जून रोजी नागपूर येथील वाना डोंगरी नागलवाडी स्थित ज्ञानज्योती अंध विद्यालयास देण्यात आलेली भेट व माहूरगड येथील जिल्हा परीषद शाळा, माहूर येथील मुख्याध्यापक एस. एस. पाटील यांच्या समन्वयातून डॉ. माधव गोरे व श्री राजेश ठाकरे यांनी केलेल्या प्रयत्नातून राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या आनंद दत्तधाम आश्रमात राष्ट्रसंत श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या समक्ष व आश्रमात उपस्थित मोठ्या प्रमाणातील श्रोत्यांसमोर संगीत क्षेत्रात दिग्गज असलेल्या राजेश ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली प्रा. कृष्णा शिंगारे, श्रावणी अडसुळे व त्यांना वादकाच्या भूमिकेत साथ देणारे संदीप चोपडे, बालाजी गुट्टे, आकाश झुलवाड, हनुमान गीते, मिरा चोपडे यांच्या सहकार्यातून मंत्रमुग्ध करून टाकणारे भक्ती गीत गायन सादर करण्याची मिळालेली संधी स्मरणार्थ राहणारी ठरली.

यावेळी सहलीचे मुख्य समन्व्यक डॉ. माधव गोरे, विशेष शिक्षक राजेश ठाकरे, स्वयंसेवकांपैकी नागनाथ मेकले इतरांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी राजेश ठाकरे यांनी मंत्र मुग्ध् करून टाकणारे गायन केले. त्यांना प्रा. कृष्णा सिंगारे व श्रावणी अडसुळे यांनी तेवढीच मोलाची साथ दिली.

या अत्यंत पवित्र स्थळी भोजन व निवासाची संधी व भजन सेवेची मिळालेली संधी या बाबी या दिग्गज संगीत कलाकारांसाठी व सहलीतील दृष्टी दिव्यांग बंधू-भगिनींसाठी मोठ्या प्रमाणात सन्मानित करणाऱ्या ठरल्या.

दि. ०४ जून २०२६ रोजी दुपारी तीन वाजता श्री खंडोबाचे दर्शन घेऊन सदर सहलीचा समारोप करण्यात आला.

चाकूर येथे रोटरी क्लब ऑफ चाकूरचे अध्यक्ष डॉ. केदार पाटील व त्यांच्या मित्रमंडळाने सहलीतील सर्व दिव्यांग बंधू/भगिनींचे सहल सांगता प्रसंगी केलेले अभिनंदन ही बाब सदर दृष्टी दिव्यांग बंधू-भगिनी कधीही विसरणार नाहीत.

या सहलीच्या यशस्वीतेसाठी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, बीयाँड व्हीजन फाउंडेशन, लातूरचे अध्यक्ष डॉ. माधव गोरे, सचीव संदीप चोपडे, कोषाध्यक्षा मीरा चोपडे, ॲड. धनंजय चिताडे, ॲड. विक्रमजी पाटील चाकूरकर, सुनीलजी ओझा, प्रविण मीटकरी, किशोर ससाने, शहरातील दानशूर व्यक्ती व संस्था यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

तसेच स्वयंसेवकाच्या रूपात सहाय्य करणारे पानगाव येथील माजी सरपंच सुकेश भंडारे, जिल्हा परिषद सहशिक्षक नागनाथ मेकले, सुदर्शन पाटील, प्रा. राजकुमार मुसने, सॉफ्टवेअर इंजिनियर कु. प्रतीक्षा गोरे, सुजाता गोरे, अमोल येर्वे, अमोल भंडारे, रुखमे दादा, गणेश माने, गणेश पवार यांनी विशेष परीश्रम घेतले.

# राज्यसभेत वाढणार 'एनडीए'ची ताकद

## संख्याबळ १५४ वर जाण्याचा अंदाज, दोन-तृतीयांश बहुमत आले जवळ


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत बंडखोरीमुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीची (एनडीए) संसदेतील ताकद वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर खासदारांच्या पाठिंब्यामुळे लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही ठिकाणी एनडीएचा आकडा वाढू शकतो.

राजकीय समीकरणांमध्ये बदल

राज्यसभेत इंडिया आघाडीचे सुमारे ६४ खासदार असल्याचे सांगितले जात आहे. काही प्रादेशिक पक्षांच्या भूमिकेमुळे भविष्यात मतदानावेळी समीकरणे बदलू शकतात. उत्तर प्रदेशसारख्या राज्यांतील आगामी निवडणुकांमुळे राज्यसभेतील संख्याबळावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**मतदारसंघ पुनर्रचना विधेयक लटकले होते...**

संसदेत दोन-तृतीयांश बहुमत मिळाल्यास सरकारला संविधान दुरुस्ती, मोठे कायदे आणि धोरणात्मक बदल अधिक सहजपणे करता येतात. यामुळे विधेयक मंजुरी प्रक्रियेत विरोधकांवरील अवलंबित्व कमी होते आणि मोठे राजकीय निर्णय घेणे सोपे होते. यापूर्वी १६ एप्रिल रोजी लोकसभेत मतदारसंघ पुनर्रचनेसंबंधी संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्यामुळे ५४ मतांनी मंजूर होऊ शकले नव्हते.



**राज्यसभेत बहुमतासाठी केवळ ९ जागांची गरज**

राज्यसभेत एनडीएकडे सध्या १४८ खासदार आहेत. आगामी निवडणुका आणि काही खासदारांच्या बदलामुळे हा आकडा १५१ पर्यंत जाण्याची शक्यता आहे. तसेच तृणमूलचे काही खासदार राजीनामा देऊन जागा रिक्त झाल्यास त्या जागांवर एनडीएने पाठिंबा दिलेले उमेदवार निवडून येऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे राज्यसभेत एनडीएची ताकद १५४ पर्यंत पोहोचू शकते. मात्र, दोन-तृतीयांश बहुमतासाठी १६३ खासदारांची आवश्यकता असल्याने एनडीए अजूनही ९ जागा दूर असेल

# रात्रीच्या वेळी केज-आंबेजोगाई महामार्गावर जबरीचोरी करणाऱ्या २ चोरट्यांना सिनेस्टाईल पाठलाग करुन केले जेरबंद!

## पोलिसांच्या दबंग कारवाईमुळे केज पोलिसांचे कौतुक

**केज/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यासह केज तालुक्यात जबरी चोऱ्यासह दरोडेच्या प्रकरणांमध्ये दिवसांनी दिवस वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने केज पोलीस अलर्ट मोडवर आले असून अशा दरोडेखोरांच्या मुस्क्या आवळण्यासाठी आणि चोऱ्या व दरोडे अशा प्रकरणाला आळा घालण्यासाठी केज पोलिसांनी धडक मोहीम उघडली असून अशा आरोपींची कुठल्याही प्रकारची गई केले जाणार नाही असे यावरून दिसून येत आहे.

अशाच प्रकारची घटना ही दिनांक १३ जून २०२६ शनिवार रोजी रात्री ११-०० वाजण्याच्या दरम्यान केज-आंबेजोगाई महामार्गावर रात्रीच्या वेळी जबरीचोरी करणाऱ्या २ चोरट्यांचा सिनेस्टाईल पाठलाग करून मुद्देमालासह जेरबंद केले असून या पोलिसांच्या दबंग कारवाईमुळे केज पोलिसांचे कौतुक होत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,दिनांक १३ जून २०२६ रोजी रात्री११-०० वा. दरम्यान केज तालुक्यातील पिसेगाव येथील धनराज नामदेव सुर्यवंशी, वय-३० वर्षे हे त्यांच्या पत्नीसह दुचाकीवरून गावाकडे जात असताना पिसेगाव फाटया जवळ त्यांच्या दुचाकीला चोरट्यांनी त्याची दुचाकी आडवी लावून चाकूचा धाक दाखवून त्यांच्याकडील रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरले असता. प्रियंका धनराज सूर्यवंशी व धनराज सूर्यवंशी यांनी जोरजोराने आरडाओरडा केल्याने यातील चोर हे त्यांच्या जवळील एक मोटरसायकल सोडून तेथून जंगलात पळून गेले अशी माहिती धनराज सूर्यवंशी यांनी भ्रमणध्वनी वरून केज पोलिसांना सांगीतले की, आम्ही पती पत्नी असे त्यांच्या मोटारसायकल क्र. एम-एच ४४ ए २४३० या नंबरच्या दुचाकी वर बसुन पिसेगाव फाट्यापासुन गावाकडे जात असतांना पिसेगाव फाट्यापासुन काही अंतरावर त्यांना एका मोटार सायकलवरील चार चोरांनी त्यांच्या कडील मोटारसायकल आडवी लावुन धनराज सूर्यवंशी व त्यांच्या पत्नीला आडवुन चाकुचा धाक दाखवुन धमकावुन पैसे आणि सोन्याचे दागीने हीसकावुन घेतले तेंव्हा प्रिंयका धनराज सुर्यवंशी व धनराज सुर्यवंशी यांनी जोरजोराने आरडा ओरड केल्याने यातील चोर हे त्यांचीजवळील एक मोटार सायकल सोडुन गेल्याची माहिती मिळाल्याने केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने, सहा. फौजदार फुलचंद सानप,



पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप, पोलीस अंमलदार गोविंद मुंडे, सहा. फौजदार शंभुदेव दराडे, तसेच डीबी पथकातील पोह/ नागरगोजे, पोअं/ देवगुडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन सदरील घटनेची माहिती घेऊन चोरांकडील मोटार सायकल क्रमांक एम-एच ४५ क्यु ८१८३ ही जागेवरच मिळुन आली. फिर्यादी धनराज नामदेव सुर्यवंशी यांनी नमुद चोराचे वर्णन सांगीतल्याप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता सदरील घटना ही सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेली आहे त्यावरून चोराची खात्री करुन त्यांचा शोध घेत असतांना या प्रकरणातील चोर हे केज शहरातुन मोटार सायकलवर बसुन केज-कळंब रोडने जात असतांना त्यांना पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने व पोह/ अनिल नागरगोजे यांनी थांबण्याचा ईशारा केला असता ते भरधाव वेगात मोटार सायकल चालवत होते तेंव्हा त्यांचा पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने व पोह/अनिल नागरगोजे यांनी चोराचा सिनेस्टाईल पाठलाग केला. नमुदआरोपी यांनी हॉटेल संतोष पॅलेस समोर मोटारसायकल क्र. एमएच ४४ ई ३५७६ ही सोडुन पळुन जात असतांना त्यांचा पाठलाग करुन त्यापैकी दोन आरोपी यांना पकडले व त्यांना अधिक चौकशी करून विचारले असता त्यांनी शेषेराव हिम्मत शिंदे, वय-५० वर्षे रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव, भिमा आबा काळे, वय १९ वर्षे रा. दत्तनगर ढोकी ता.जि. धाराशिव अशी नावे असल्याचे सांगीतले त्यामधील शेषेराव हिम्मत शिंदे याची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये गुन्हयातील चोरलेली रोख१८०० रुपये रक्कम मिळुन आली. फिर्यादी धनराज नामदेव सुर्यवंशी, वय-३० वर्षे व्यवसाय-मजुरी, रा. पिसेगाव यांच्या फिर्यादीवरुन केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३७१/२०२६ कलम ३०९(४), ३०९(६)भारतीय न्यायसंहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदरील गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सफौ/ फुलचंद सानप हे करीत आहेत. सदरची कामगीरी ही प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधिक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलीस ठाऐ पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने, सहा. फौजदार फुलचंद सानप, पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप, पोलीस अंमलदार गोविंद मुंडे, सहा. फौजदार शंभुदेव दराडे, तसेच डीबी पथकातील पोह/नागरगोजे, पोअं/ देवगुडे यांनी केली आहे.

## शाळा भरण्याच्या पाहिल्याच दिवशीच सानपवस्ती वस्ती शाळेच्या छताचे प्लास्टर गळून पडले; विद्यार्थी झाडाखाली बसवून अध्यापन सुरु



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील सानपवस्ती ( तरनळी ) जि.प.प्रा शाळेची इमारत विद्यार्थ्यांसाठी धोकादायक बनली आसून सोमवारी दिनांक १५ जून २०२६ रोजी मुख्याध्यापक श्रीकांत उजगरे यांनी उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर शाळा भरल्यामुळे सोमवारी सकाळी शाळेची वर्ग खोली उघडताच कांही वेळात इमारतीच्या छताचे प्लास्टर गळून पडले. छताचे प्लास्टर गळून खाली पडून त्याचा ढिगारा साचला आहे. छताचे लोखंडी गज उघडे पडल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी धोकादायक बनलेल्या या वर्गखोलीत विद्यार्थी बसू द्यायला पालकांनी व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश सानप यांनी विरोध केला आहे.

या प्रकरणी मुख्याध्यापक श्रीकांत उजगरे यांनी गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.सोमवारी सकाळी शाळा भरण्यापूर्वी व परिपाटांपूर्वी विद्यार्थी वर्गखोली बाहेर आसताना सकाळी ९-३० वाजता अचाणकच छताचे प्लास्टर जमिनीवर कोसळल्यामुळे विद्यार्थी बालंबाल बचावले आहेत. या घटनेमुळे विद्यार्थी भयभीत झाले आसून पालक विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यास तयार नाही.

यांप्रकारणी मुख्याध्यापक श्रीकांत उजगरे यांनी गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे यांची भेट घेवून पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी केली असता, शाळा व्यवस्थापन समिती व गावाकऱ्यांशी चर्चा करून विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था तुमच्या स्तरावर करावी आशा सूचना त्यांनी मुख्याध्यापक श्रीकांत उजगरे यांना दिल्याची माहिती उजगरे यांनी बोलताना दिली.

## जेष्ठ पत्रकार सतीश केजकर यांच्या वयाची साठी तर पत्रकारीतेची ३४ वर्षे १६ जुन रोजी पुर्ण



**केज/प्रतिनिधी :** केज येथील ज्येष्ठ पत्रकार श्री सतीश व्यंकटराव केजकर यांना वयाची साठ वर्ष पूर्ण झाली. तर पत्रकारितेत ३४ वर्षाचा पण प्रवास त्यांनी पूर्ण केला. वयाचे अर्धे वर्ष हे पत्रकारितेत घालवले त्यांनी अनेक चढउतार या पत्रकारितेत बघितले १९९२ ला त्यांनी पत्रकार तिची सुरुवात केली. तो काळ आणि आजचा काळ यात जमीन आसमांचा फरक आहे कारण त्यावेळेस प्रत्यक्ष बातमी लिहायला लागायची व घटनास्थळी जाऊन माहिती घ्यायची. ती बातमी लिहून ते पाकीट कंडक्टर जवळ द्यायचे व बातमी छापून यायची वाट बघायची. त्यांनी अनेक पत्रकार घडविले.त्यांनी विवेक संधु,अजिंठा, गावकरी, चंपावती पत्र, सर्वसाक्षी,देवगिरी तरुण भारत, सोलापूर तरुण भारत, आशा अनेक वर्तमानपत्रातून काम करून त्यांनी पत्रकारितेचा प्रवास आज पर्यंत जपला आहे. आज ते स्वतःचे साप्ताहिक केज परिसर १४ वर्षापासून सांभाळतात व केज तालुक्यात प्रथम अधिस्वीकृती मिळवण्याचा मान त्यांनाच मिळाला पण कधीही त्याचा त्यांनी गर्व केला नाही आजही त्यांच्या विनम्र स्वभाव व हसतमुख चेहरा पाहून त्यांच्याकडून आणि गोष्टी शिकण्यासारखे आहेत १९९५ ला युवा पत्रकार संघटना स्थापन केली त्यानंतर त्यांनी जनतेसाठी व शेतकरी असो शैक्षणिक असो अनेक समस्यांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आज वयाची साठ वर्ष पूर्ण झाली असे त्यांच्याकडे बघून वाटत नाही. पत्रकारितेतील अनेक किस्से ते सांगताना म्हणतात की पाकीट पासून एक रुपयाच्या कॉइंडिंग बॉक्स फॅक्स टेलिफोन ई-मेल ते आजच्या अँड्रॉइड फोन पर्यंत त्यांनी अनुभव घेतलेला आहे त्यांच्यापासून खूप काही शिकण्यासारखे आहे त्यांच्या उरोळीत आयुष्याला ती लाभो व पत्रकारितेची सेवा अजूनही त्यांच्या हातून घडो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

## शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी :** जेएसपीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून प्रवेश उत्सव २०२६ उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषपूर्ण स्वागत करत नवीन शैक्षणिक वर्षाची सकारात्मक सुरुवात करण्यात आली. प्रवेश उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच चॉकलेटचे वितरण करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फ ुलविण्यात आला. नवीन विद्यार्थ्यांच्या शाळेतील पहिल्या दिवसाच्या आठवणी कायमस्वरूपी जतन करण्यासाठी त्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षणाचा विषय ठरला.

यावेळी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. जुन्या विद्यार्थ्यांनी नवीन विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत केले. नवीन शैक्षणिक वर्ष म्हणजे नव्या संधी, नवी ध्येये आणि ज्ञान, संस्कार व गुणवत्तेच्या दिशेने नवी वाटचाल असल्याचा संदेश प्राचार्य गोविंद शिंदे यांनी आपल्या मनोगतातून दिला.

प्रवेश उत्सवाला विद्यार्थ्यांची तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचा उत्साह यामुळे संपूर्ण विद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमास प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, उपमुख्याध्यापक गणेश कदम, मुख्याध्यापक बाळाराम पिचारे, उपमुख्याध्यापिका अलका अंकुशे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक प्रतिनिधी राजकुमार साखरे यांच्यासह अनेक पालक प्रतिनिधी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

**लातूर/प्रतिनिधी : :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. लातूर जिल्ह्यातील रेणापूर आणि जळकोट तालुक्यांमध्ये प्रत्येकी मुलांचे एक व मुलींचे एक अशी एकूण चार शासकीय वसतिगृहे कार्यरत असून या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवर्गनिहाय अर्ज करावे लागणार आहेत.

या प्रवेश प्रक्रियेत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ९० टक्के, ऊसतोड कामगारांचे पाल्य असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के, ऊसतोड कामगार असलेल्या विधवा, परित्यक्ता व एकल पालक यांच्या पाल्यांकरिता ३ टक्के, तर ज्यांचे मृत्यू झालेले पालक ऊसतोड कामगार होते अशा अनाथ पाल्यांसाठी २ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी ३० जून २०२६ पर्यंत अर्ज करणे आवश्यक असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ७ जुलै २०२६ रोजी अंतिम केली जाईल, तर इयत्ता ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावयाचे असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ३१ जुलै २०२६ रोजी अंतिम करण्यात येणार आहे.

या वसतिगृहांमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत शैक्षणिक साहित्य, स्टेशनरी, एका वेळेचा सकस नाश्ता आणि दोन वेळचे चविष्ट भोजन यासह विविध शैक्षणिक सोयी-सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे जिल्ह्यातील अधिकाधिक ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांचे गृहपाल तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा एल्गार:१६ जूनपासून सेवा ठप्प होण्याची शक्यता

**मुंबई /प्रतिनिधी :** अनेक प्रलंबित मागण्यांसाठी वारंवार दाद मागूनही प्रशासन केवळ वेळखाऊ धोरण राबवत असल्याचा आरोप करत, राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी आरपारच्या लढाईची घोषणा केली आहे. उद्यापासून (१६ जून) राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा एल्गार पुकारला आहे. या संपामुळे राज्यातील वाहन परवाने, गाड्यांचे पासिंग, आरसी बुक यांसह आरटीओ कार्यालयातील बहुतांश सर्वच कामे ठप्प होण्याची शक्यता असून सर्वसामान्यांना फटका बसणार आहे.

मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विभागाचा नवीन आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षे उलटून गेली आहेत. तरीही अद्याप सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले नाहीत. नियम तयार नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांना वेळेवर पदोन्नती मिळत नाही. यामुळे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत आहे. असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

संपाबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवारी संघटनेची एक तातडीची आणि महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सर्व पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या धोरणावर कडाडून टीका केली. कर्मचाऱ्यांच्या बहुतांशी मागण्या या केवळ प्रशासन स्तरावर सहज सुटू शकतात, मात्र वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. बैठकीअंती आता 'बेमुदत संपाशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही' यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. आम्ही प्रशासनाला आणि सरकारला आमचे प्रश्न सोडवण्यासाठी पुरेसा वेळ दिला. मात्र, केवळ टोलवाटोलवीशिवाय आमच्या हाती काहीही आले नाही. त्यामुळेच १६ जूनपासून आम्ही राज्यभरात बेमुदत संपावर जात आहोत.

सरकारने आमच्या प्रलंबित मागण्यांबाबत त्वरित आणि सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आरटीओ कर्मचारी या आंदोलनातून अजिबात माघार घेणार नाहीत, असा थेट आणि स्पष्ट पवित्रा संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी जाहीर केला आहे.

## १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी, सरकारचा सर्वात मोठा निर्णय; ९० टक्के पालकांचा बंदीला पाठिंबा, ब्रिटन पंतप्रधान कीर स्टार्मर यांचा मोठा निर्णय

**लंडन/वृत्तसंस्था :** मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि मानसिक आरोग्यासाठी ब्रिटन सरकारने आतापर्यंतचे सर्वात मोठे पाऊल उचलले आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी सोमवारी जाहीर केले की, देशात १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया साईटस्वर पूर्णपणे बंदी घातली जाईल. याशिवाय गेमिंग आणि लाईव्ह स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवरही कडक निर्बंध लादले जातील.

एका पत्रकार परिषदेत बोल-ताना पंतप्रधान स्टार्मर म्हणाले, मुलांना ऑनलाईन सुरक्षित ठेवणे आणि मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या मक्तेदारीला लगाम घालणे आवश्यक आहे. हा निर्णय ब्रिटनच्या मूल्यांना दर्शवतो. १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर पूर्ण बंदी घालणे हाच योग्य पर्याय आहे. या निर्णयामुळे टिकटॉक, स्नॅपचॅट आणि इन्स्टाग्रामसारख्या लोकप्रिय साईटस्वर बंदी येईल. तसेच अनोळखी व्यक्तींशी संवाद साधण्याची परवानगी देणाऱ्या गेमिंग आणि लाईव्ह स्ट्रीमिंग सेवांवरही कारवाई केली जाईल. ऑफलाईन जगात आपण आपल्या मुलाला अनोळखी व्यक्तीसोबत सोडतो का, मग ऑनलाईन जगात असे का होऊ द्यायचे, असा सवाल त्यांनी केला.

सरकारकडे या बंदीचे पहिले पाऊल उचलण्याचे अधिकार असून वर्षाच्या अखेरीस याचे नियम तयार केले जातील आणि पुढील वर्षाच्या सुरुवातीला (स्प्रिंग २०२१) ही बंदी पूर्णपणे लागू होण्याची शक्यता आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलियाने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घा-तली होती. ऑस्ट्रेलियानंतर असा निर्णय घेणारा ब्रिटन हा दुसरा मोठा देश ठरणार आहे.

### ९० टक्के पालकांचा बंदीला पाठिंबा

या निर्णयापूर्वी ब्रिटन सरकारने पालक, शिक्षक आणि तरुणांशी विस्तृत चर्चा केली. यात १ लाख १६ हजारहून अधिक प्रतिक्रिया मिळाल्या. धक्कादायक बाब म्हणजे, ८३ टक्के पालकांनी मानले की, सोशल मीडियाचे फायदे कमी आणि तोटे जास्त आहेत, तर ९० टक्के पालकांनी मुलांसाठी १६ वर्षे ही किमान वयोमर्यादा असण्याच्या बाजूने कौल दिला. दरम्यान, काही मानसशास्त्रज्ञांनी या बंदीच्या प्रभावितेवर शंका उपस्थित केली आहे.




१) गेमिंग आणि लाईव्ह स्ट्रीमिंगवर निर्बंध : अनोळखी व्यक्तींशी संवाद साधण्याची परवानगी देणाऱ्या गेमिंग आणि लाईव्ह स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवरही कडक कारवाई केली जाईल.

२) पुढील वर्षापासून अंमलबजावणी : या वर्षाच्या अखेरीस नियम तयार करून पुढील वर्षाच्या सुरुवातीला (स्प्रिंग) ही बंदी पूर्णपणे लागू केली जाण्याची शक्यता आहे.

३) ९० टक्के पालकांचा मोठा पाठिंबा : सरकारी सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ९० टक्के पालकांनी मुलांसाठी सोशल मीडिया वापराची वयोमर्यादा किमान १६ वर्षे ठेवण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे.

# सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात संपन्न; संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत





**लातूर/प्रतिनिधी :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, शाळेबद्दल आत्मीयता वाढावी आणि प्रत्येक बालक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे, या उद्देशाने लातूर येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, मुख्याध्यापक इस्माईल शेख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत इयत्ता पाचवीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय शिस्त, स्वच्छता, नियमित उपस्थिती, वाचन संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यंदाच्या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट यश संपादन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी बोलताना संस्था सचिव कालिदास माने म्हणाले, ''विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देणे ही शाळेची जबाबदारी आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, सर्जनशीलता आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवून शिक्षकांशी सातत्याने संवाद साधावा. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.''

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या प्रवेशोत्सवामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी आणि प्रेरणादायी ठरली.

## आयआयटी प्रवेश परीक्षेत यश मिळवल्याबद्दल आदित्य कुरील यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** सम्राट चौक लातूर येथील गुरु रविदास भवन मध्ये मोची समाजाची बैठक समाजाचे अध्यक्ष रवि कुरील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी समाजातील आदित्य विजयकुमार कुरील या विद्यार्थ्याने आयआयटी प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्यामुळे समाजाच्या वतीने त्याचा शाल पुष्पहार घालून गुरु रविदासाचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला तसेच यावेळी मुलाचे पालक विजयकुमार कुरील यांचा देखील सत्कार करण्यात आला तसेच समाजातील रोहित जवाहर कुरील या विद्यार्थ्याने परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल त्यांच्या पालकाचा सत्कार करण्यात आला. यावेळी समाजातील इतर मुलांनी आदित्य आणि रोहित यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून खूप अभ्यास करावा असे आवाहन समाजाचे अध्यक्ष रवी कुरील यांनी केले. यावेळी समाजातील जेष्ठ पूर्बिदीन कुरील भीकचंद दिवेकर पूनमचंद दास भरत कुरील संतोष कुरील धीरज कुरील राजकुमार चौधरी,आकाश दुर्गे ,होरीलाल कुरील, राजू कुरील, बजरंग दुर्गे अशोक परदेसी, होरीलाल कुरील , दिनेश दिवेकर सोनी कुरील सतीश कुरील नितीन कुरील गणेश परदेशी चंदन कुरील, आर्यन कुरील , किसन कुरील , रतन कुरील,सुरेश कुरील, मोहन कुरील यांच्यासह समाजातील पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगाव ( बोरी) येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डोंगरगाव बोरी येथील जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत नागमोडे हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून अंगणवाडी कार्यकर्ती पुष्प लता सूर्यवंशी अंगणवाडी सेविका रेणुका गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य संजीव पटणे ,मसाजी वंटे, शिक्षण प्रेमी पालक अमोल काळे साहेबराव गायकवाड उमाकांत पवार गुणवंत काळे गायत्री काळे लक्ष्मीबाई जाधव सह आदीजन उपस्थित होते.

सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यानंतर इयत्ता पहिलीच दाखल झालेल्या नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पहार गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरण करण्यात आली तसेच शालेय गणवेश वितरण करण्यात आले.

यानंतर गावातून नवागतांची प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी पालकांचा प्रतिसाद चांगला मिळाला. यानंतर शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी शिरा आणि मसालेभात चे नियोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रवि कुरील यांनी उपस्थित पालकांसमोर जिल्हा परिषद शाळेत राबवल्या जाणाऱ्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार शाळेतील शिक्षिका श्रीमती शितल काळे यांनी मानले.

## भारतीय किसान संघाचा लातूर जिल्ह्यात शेतकरी मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय किसान संघ यांच्या वतीने २६ ते २९ जून २०२६ या चार दिवसात लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी शेतकरी मेळावा व पद्मश्री सन्मान प्राप्त डॉ. श्रीरंग देवबा लाड यांचा सत्कार असा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असून या मेळाव्याला जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले व मंत्री सतीश देशपांडे-तावशीकर यांनी केले आहे.

भारतीय किसान संघाने जिल्ह्यात २६ जून २०२६ रोजी लातूर येथील एमआयटी कॉलेज येथे सकाळी १० वाजता प्रगतशील शेतकरी तुळशीरामअण्णा कराड व काशीरामनाना कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा संपन्न होणार आहे. तसेच दि. २७ जून रोजी राजूर (अहमदपूर), दि. २८ जून रोजी किल्लारी येथे तर २९ जून रोजी उदगीर या तिन्ही ठिकाणी सकाळी ११ वाजता शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या चारही मेळाव्यात पद्मश्री सन्मान पुरस्कार प्राप्त डॉ. श्रीरंग देवबा लाड यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून शेती व्यवसायात नवनवीन प्रयोग करून अधिकाधिक उत्पन्न घेण्याच्या संशोधनात डॉ. श्रीरंग लाड यांची मोठी भूमिका राहिलेली आहे. याबद्दल शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन नुकताच सन्मान केला आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांचे मौलीक असे मार्गदर्शन लाभणार आहे. या मेळाव्यास जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची भेट; मनपाच्या नवीन जॅकवेल कामाची पाहणी



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव येथील मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला असून, राज्य शासनाच्या आदेशानुसार धरणातील सर्व पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

एल निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाने तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच, धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर नियमानुसार तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्यासाठी अमृत २.० योजनेअंतर्गत मांजरा धरण परिसरात नवीन जॅकवेल उभारण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या प्रगतीची माहिती घेतली. या पाहणी दौऱ्यावेळी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील आणि लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात चेक बाऊन्स प्रकरणांसाठी १८ जुलै व २१ नोव्हेंबरला विशेष लोक अदालतीचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशान्वये लातूर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १८ जुलै २०२६ आणि २१ नोव्हेंबर २०२६ रोजी परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ नुसार दाखल असलेल्या चेक बाऊन्स (धनादेश अनादरीत) प्रकरणांसाठी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या पक्षकारांची तसेच बँक व वित्तीय संस्थांची या कलमानुसारची प्रकरणे सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत, त्या सर्वांनी या विशेष लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

या विशेष लोक अदालतीमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी समान संधी मिळते आणि दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड आपसी संमतीनेच केली जाते. न्यायालयात वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रियेला फाटा देत, येथे एकाच दिवशी आपसी संमतीने प्रकरण निकाली निघत असल्याने पक्षकारांचा मौल्यवान वेळ व पैसा वाचतो, तसेच प्रकरण निकाली निघाल्यावर भरलेले न्यायालयीन शुल्क देखील नियमानुसार परत मिळते. त्यामुळे सर्व संबंधित पक्षकार आणि विधीज्ञांनी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रकरणे मोठ्या प्रमाणावर आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनीने घेतली मुख्यमंत्र्यांची मुलाखत



**रायगड-अलिबाग/प्रतिनिधी :** पनवेल येथील पीएमश्री रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वहाळ येथे आयोजित शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी संवाद घडला. शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनीने मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेत शिक्षण, सामाजिक कार्य आणि डिजिटल युगातील बदलांबाबत प्रश्न विचारले. विद्यार्थिनीच्या आत्मविश्वासपूर्ण प्रश्नांना मुख्यमंत्र्यांनी मनमोकळेपणाने उत्तरे देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास माजी खासदार रामशेठ ठाकूर, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, विधान परिषद सदस्य विक्रांत पाटील, आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रवासाबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, विद्यार्थी म्हणून भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करताना विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवत-सोडवत त्यांचा सामाजिक आणि राजकीय प्रवास सुरू झाला. समाजात सकारात्मक बदल घडवून आणताना संघर्ष अपरिहार्य असतो, मात्र चांगल्या कार्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले.

डिजिटल युगातील शिक्षणाविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, डिजिटल शिक्षण हे काळाची गरज असून भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. कार्यक्रमादरम्यान शाळेतील आयडियल सेंटर लॅबचे उद्घाटन व पाहणी करण्यात आली. या डिजिटल लॅबमुळे विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून विषय अधिक प्रभावीपणे समजून घेता येतील. तसेच प्रश्नोत्तरे, स्वमूल्यमापन आणि ऑनलाईन शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होणार असल्याने शिक्षण अधिक दर्जेदार आणि आकर्षक होईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे शाळेत स्वागत करण्यात आले. तसेच नवागत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी डिजिटल लॅबचा नियमित वापर करून ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्र्वास वाढविण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याची आणि मुलाखत घेण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

विद्यार्थिनीने घेतलेली ही मुलाखत आणि त्यातून मिळालेला प्रेरणादायी संदेश हा शाळा प्रवेशोत्सवाचा विशेष आकर्षण ठरला.

# काटगाव येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेचा पहिला दिवस उत्सवात रूपांतरित करणे, या उद्देशाने शासनाच्या वतीने राबविण्यात येणारा शाळा प्रवेशोत्सवचा लातूर जिल्ह्यातील काटगाव येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, प्राथमिकच्या उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी, लातूरचे गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. याच पार्श्वभूमीवर काटगाव येथील शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन अत्यंत आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके व गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले.

या प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. शाळेचे पर्यावरण अधिक समृद्ध आणि हिरवेगार व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आवड निर्माण व्हावी, हा यामागील उद्देश होता. शाळेतील विद्यार्थ्यांनीही वृक्षारोपण करून या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, या अनुषंगाने राज्यभर हा प्रवेशोत्सव साजरा केला जात आहे. या अंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना देण्याची पहिले पाऊल ही अभिनव संकल्पनाही राबविली जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात काटगाव येथील शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित बालकांच्या पायाचे ठसे घेण्यात आले.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक श्री. मांदळे, केंद्रप्रमुख वामन राठोड, शिक्षक विजय माळाळे, गोविंद गारकर आणि श्रीमती राजमाले, श्रीमती तांदळे, श्रीमती खंडागळे, श्रीमती लांडगे, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती सय्यद उपस्थित होत्या.

**विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी**



आपल्या शाळेत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देवून त्यांचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देवून या अनुषंगाने शिक्षकांशी सातत्याने संवाद ठेवावा, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.